
## नागपूरकरांनी अनुभवला चंद्रग्रहण सोहळा




१ मंगळवारी नागपूरकरांनी अंधश्रद्धा झुगारून मनमुरादपणे चंद्रग्रहणाचा आनंद लुटला. अरुणाचल प्रदेशात लवकर चंद्रोदय झाल्याने त्यांनाच केवळ खग्रास चंद्रग्रहण पाहता आले.

२ देशाच्या उर्वरित भागात खंडग्रास ग्रहण दिसले. विदर्भात चंद्रोदय झाला, तेव्हा ग्रहण सुटणे सुरू झाले होते. ५.३४ मिनिटांनी तो सर्वाधिक ग्रहणात होता.

# आधी फिटनेसची तपासणी, मगच 'भारत जोडो'त पदयात्री

## केवळ १२० जणांची निवड : मराठवाड्यातून एकमेव श्रावण रॅपनवाड

**शिवराज बिचेवार**
लोकमत न्यूज नेटवर्क

**देगलूर (जि. नांदेड) :** काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी कन्याकुमारीपासून सुरू केलेल्या भारत जोडो पदयात्रेत त्यांच्यासोबत सहभागी होण्यासाठी अतिशय अवघड अशा तपासण्या करण्यात आल्या. पाच महिने चालणाऱ्या या संपूर्ण पदयात्रेत सहभागी होण्यासाठी देशभरातून २ हजार जण दिल्लीत दाखल झाले होते. मात्र, शारीरिक तपासणी, चालण्याची सवय या बाबींबरोबरच इतर कोणत्याही व्याधी नसलेल्या केवळ १२० जणांची निवड करण्यात आली. त्यामध्ये मराठवाड्यातून नांदेडचे डॉ. श्रावण रॅपनवाड हे एकमेव ठरले आहेत.

ही निवड करताना कौटुंबिक पार्श्वभूमीसह फिटनेस, रक्तदाब, मधुमेह यासह इतर आजार या बाबींची दिल्लीत तपासणी करण्यात आली. त्यानंतर मुलाखत घेण्यात आली. जवळपास दोन हजार कार्यकर्त्यांच्या दिल्लीत मुलाखती घेण्यात आल्या. त्यात मराठवाड्यातून श्रावण रॅपनवाड हे एकमेव कार्यकर्ते निवडले आहेत.

### पदयात्रेत सांगलीच्या डॉक्टरांची टीम

पदयात्रेत सहभागी झालेल्या यात्रेकरूंच्या आरोग्याविषयी काही समस्या निर्माण झालीच तर त्याच ठिकाणी उपचार करता यावेत. याव्यतिरिक्त पदयात्रींचे आरोग्य सुदृढ राहावे, या उद्देशाने डॉक्टरांचे एक पथक आणि रुग्णवाहिकाही पदयात्रेत सज्ज आहेत. युवक काँग्रेसचे डॉ. विश्वजित कदम यांनी भारती विद्यापीठाकडून या विद्यापीठातील तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक या यात्रेत सज्ज ठेवले आहे. सांगली येथून १० डॉक्टरांची टीमही सहभागी झाली आहे.


भारत जोडो पदयात्रेत खासदार राहुल गांधी यांच्यासमवेत चालताना नांदेड येथील काँग्रेस कार्यकर्ते डॉ. श्रावण रॅपनवाड. (छाया : सचिन मोहिते)

### 'भारत जोडो'त राज्यातील नऊ जणांचा समावेश

- भारत जोडो यात्रेत महाराष्ट्रातील नऊ जणांचा समावेश आहे.
- त्यात मराठवाड्यातून एकमेव नांदेडचे श्रावण रॅपनवाड यांच्यासह रोहन लाल बिट्टू, मनिंदर सिंग वोरा, वैष्णवी भारद्वाज, नंदा म्हात्रे, आतिशा पैठणकर, सत्यम ठाकूर, मनोज कुमार उपाध्याय आणि पिंकी राजकुमार सिंग यांची भारत यात्री म्हणून निवड झाली आहे.


पदयात्रा मार्गावर उभारलेल्या विश्रांती कक्षात थांबलेले पदयात्री.

### अशी आहे राहुल गांधी यांची दिनचर्या

- खासदार राहुल गांधी आणि यात्रेतील सहभागी सर्वांची दिनचर्या ही पहाटे साडेचार वाजता सुरू होते. साडेपाच वाजता ध्वजवंदन झाल्यानंतर यात्रेला सुरुवात होते. सकाळच्या सत्रात चालल्यानंतर दुपारच्या सत्रात विश्रांती असते. यावेळी राहुल गांधी हे बुद्धिवादी लोकांशी संवाद साधतात.
- विश्रांतीनंतर पुन्हा ही यात्रा सुरू होते. रात्री मुक्कामाच्या ठिकाणी सर्व कार्यकर्त्यांची आरोग्य तपासणी केली जाते. त्यासाठी ६ डॉक्टरांचे पथक आणि दोन रुग्णवाहिका सज्ज ठेवल्या आहेत.

# आता भारत जोडो साहित्य दिंडी

## राहुल गांधींच्या यात्रेला १२० साहित्यिक, विचारवंत, कलावंतांचा पाठिंबा

**भारत दाढेल**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** अलीकडच्या काळात काही कालबाह्य, असहिष्णू भ्रम निर्माण करून नवे आदर्श निर्माण केले जात आहेत. या विकृतीकरणाचा संसर्ग वाडी, वस्ती, तांडे, खेड्यापर्यंत पोहोचायला सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर लेखक, कवी, चित्रकार, कलावंत यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. सहिष्णू भारत घडविण्यासाठी 'भारत जोडो' यात्रेच्या निमित्ताने साहित्यिक मंडळी पुढे आली असून, त्यांनी 'भारत जोडो साहित्य दिंडी' स्थापन केली आहे.

राहुल गांधी यांची 'भारत जोडो' यात्रा देगलूरमार्गे महाराष्ट्रात दाखल झाली आहे. या यात्रेला राज्यातील १२० साहित्यिक, विचारवंत, कलावंतांनी पाठिंबा दिला असून यात्रेत सहभागी होण्यासाठी राज्यभरातील साहित्यिक, कलावंत नांदेड येथे दाखल झाले आहेत.

या दिंडीचे निमंत्रक प्रा. डॉ. दत्ता भगत, डॉ. जगदीश कदम, प्रा. श्रीकांत देशमुख, डॉ. विशाल पतंगे, विजय वाकोडे हे आहेत. या समितीच्या वतीने मंगळवारी स्थानिक साहित्यिकांची बैठक घेण्यात आली.


राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला नांदेड जिल्ह्यातील देगलूरमध्ये मंगळवारी लक्षणीय प्रतिसाद मिळाला.

### या साहित्यिकांचा पाठिंबा

वसंत आबाजी डहाके, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, रा.रं. बोराडे, कौतिकराव ठाले पाटील, अनुराधा पाटील, फ.मुं. शिंदे, डॉ. लीला शिंदे, संदेश भंडारे, प्रा. राजन गवस, सुमती लांडे, प्रवीण बांदेकर, लक्ष्मीकांत देशमुख, श्रीपाल सबनीस, महावीर जोंधळे, इंदुमती जोंधळे, प्रा. सदानंद देशमुख, भु.द. वाडीकर, कवी पी. विठ्ठल, डॉ. शेषराव मोहिते, डॉ. नागोराव कुंभार, लोकनाथ यशवंत, डॉ. श्रीराम गव्हाणे, शिवा अंबुलगेकर, डॉ. उत्तम सावंत, प्रा. डॉ. मारोती कसाब, डॉ. रामचंद्र काळुंखे आदी यात्रेत सहभागी होतील.

भारत जोडो यात्रेत सहभागी होण्यासाठी राज्यभरातील साहित्यिक नांदेडमध्ये दाखल झाले आहेत. कळमनुरी येथे १२ नोव्हेंबर रोजी राहुल गांधी यांची भेट घेऊन साहित्यिक त्यांच्याशी संवाद साधणार आहेत, तसेच, त्यांना निवेदन देणार आहेत.
**- डॉ. जगदीश कदम,** समन्वयक

# माजी मंत्री परब यांच्यासह तिघांवर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**दापोली (जि. रत्नागिरी) :** मुरुड समुद्रकिनाऱ्यावरील वादग्रस्त साई रिसॉर्टप्रकरणी दापोली पोलीस स्थानकात माजी परिवहन मंत्री अनिल परब यांच्यासह तत्कालीन सरपंच सुरेश शंकर तुपे आणि ग्रामविकास अधिकारी अनंत ज्ञानदेव कोळी यांच्यावर शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवारी रात्री १२ वाजता हा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती भाजप नेते किरीट सोमय्या यांनी ट्वीट करून दिली आहे. गटविकास अधिकारी रूपा दिघे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

# सत्त्वशील विचारवंताचा बहुमान

## साहित्य संमेलनाचे नूतन अध्यक्ष बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे धनी

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** महाराष्ट्रातील समाज जीवनातील महनीय व्यक्ती चरित्रे लिहिणारे न्या. नरेंद्र चपळगावकर यांची मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.

निवडीनंतर 'लोकमत'शी संवाद साधताना चपळगावकर म्हणाले, एम.ए. मराठी आणि एलएल.बी. झाल्यानंतर प्राध्यापक व्हावे अथवा वकिली व्यवसाय असे दोन पर्याय होते. पण मराठीचा प्राध्यापक झालो. तेव्हा २०० रुपये पगार आणि ३५ रुपये भत्ता होता. वर्षभरात नोकरी सोडली आणि वकिली व्यवसाय सुरू केला. जोरदार प्रॅक्टिस सुरू असताना मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. दहा वर्षे न्यायमूर्ती म्हणून काम केले.

**ग्रंथसंपदा :** कर्मयोगी संन्यासी, राज्यघटनेचे अर्धशतक, त्यांना समजून घेताना, पंतप्रधान नेहरू, महात्मा गांधी आणि भारतीय राज्यघटना, साहित्य आणि स्वातंत्र्य, आठवणीतले दिवस, अनंत भालेराव : काळ आणि कर्तृत्व इ.



### सन्मान

- श्री. ग. माजगावकर पुरस्कार
- अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार
- भैरुरतन दमाणी पुरस्कार

### व्याहीही अध्यक्ष

२००२ मध्ये इंदूर येथे पार पडलेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विजया राजाध्यक्ष होत्या. त्या न्या. चपळगावकर यांची कन्या सायली यांच्या सासूबाई आहेत. त्यामुळे विहीणबाईंनंतर २० वर्षांनी त्यांचे व्याही न्या. चपळगावकर यांना हा बहुमान मिळाला आहे. ही माहिती सायली राजाध्यक्ष यांनी शेअर केली.

# रमेश यांना तिरंगा दिला आणि पांडे कोसळले...

लोकमत न्यूज नेटवर्क

**देगलूर (जि. नांदेड) :** भारत जोडो पदयात्रेत सहभागी झालेले अखिल भारतीय काँग्रेस सेवा दलाचे राष्ट्रीय सरचिटणीस कृष्णकुमार पांडे (नागपूर) यांचे मंगळवारी सकाळी ८:३५ च्या सुमारास हृदयविकाराने निधन झाले. ही घटना वन्नाळी ते आटकळी यादरम्यान घडली.

पांडे हे यात्रेतील झेंडा तुकडीचे संचलन करीत होते. हातात तिरंगा ध्वज घेऊन ते चालू लागले. काही वेळानंतर हा ध्वज त्यांनी जयराम रमेश यांच्याकडे दिला. तेवढ्यात त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्यांना तातडीने दवाखान्यात दाखल करण्यात आले. मात्र, यातच त्यांचे निधन झाले. राहुल गांधी व काँग्रेस नेत्यांनी अंत्यदर्शन घेतल्यानंतर कृष्णकुमार पांडे यांचे पार्थिव नागपूरकडे रवाना करण्यात आले.


पदयात्रा आटकळीकडे जात असताना हातात तिरंगा घेऊन कृष्णकुमार पांडे यांनी झेंडा तुकडीचे नेतृत्व केले, त्या अखेरच्या क्षणांचे मंगळवारी त्यांच्या निधनाच्या काही मिनिटे आधी टिपलेले छायाचित्र. (छाया : किरण मुधोळकर)

### अशी भेट होईल असे वाटले नव्हते...

- खासदार राहुल गांधी यांची भेट घ्यायची आहे, असा आग्रह कृष्णकुमार पांडे यांचा मुलगा धीरज याने केला होता. त्यावर कृष्णकुमार पांडे यांनी त्यास पदयात्रेत भेट घालून देतो, असे सांगितले. त्यावरून धीरज व नागपूर येथील युवक काँग्रेसचे कार्यकर्ते पदयात्रेत सहभागी झाले होते.
- मंगळवारी कृष्णकुमार पांडे यांचे निधन झाले. त्यानंतर शोक व्यक्त करताना धीरज पांडे म्हणाले, राहुल गांधी यांच्यासमवेत अशा प्रसंगी भेट होईल, असे वाटले नव्हते.

# साने गुरुजी सनातनी व्यवस्थेविरुद्ध उभे राहिले : पवार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला कष्टकऱ्यांचा देव असलेल्या पांडुरंगाच्या मंदिरात दलितांना प्रवेश नव्हता, यासाठी साने गुरुजींनी दलितांना मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून आंदोलन उभे केले. ते सनातनी व्यवस्थेविरुद्ध मजबुतीने उभे राहिले. पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून साने गुरुजींनी चळवळ उभी केली, असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी केले.

संत तनपुरे महाराज मठात उभा करण्यात आलेल्या साने गुरुजी स्मारकाच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते ऑनलाईन बोलत होते. पवार म्हणाले, विठ्ठल हा कष्टकऱ्यांचा देव असूनही त्यामध्ये लाखोंच्या संख्येने दर्शनासाठी येणाऱ्या दलितांना प्रवेश नव्हता, त्यामुळे साने गुरुजींनी त्यावेळच्या मुंबई सरकारकडे तसेच विठ्ठल देवस्थानच्या त्यावेळच्या पंच कमिटीकडे पत्रे लिहून आवाहन केले होते की, सर्व माणसे देवाची लेकरं आहेत. या लेकरांना मंदिरात प्रवेश मिळावा. शेवटी साने गुरुजींनी १ मे ते १० मे या काळात पंढरपुरात उपोषण केले आणि मंदिर खुले झाले.

# तिसऱ्या मजल्यावर पंचायतीत नेला रेडा

**प्रमोद सुकरे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कऱ्हाड (जि. सातारा) :** ड्रेनेज पाइपलाइनचे लिकेज काढण्याकडे ग्रामपंचायत दुर्लक्ष करीत असल्याने एका शेतकऱ्याने तिसऱ्या मजल्यावरील ग्रामपंचायत कार्यालयात रेडा नेला. 'आधी लिकेज काढा, मगच रेडा खाली घेऊन जाणार', अशी भूमिका घेतली. याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने याची चर्चा जोरदार सुरू आहे.

जगताप यांनी गळती काढण्याची मागणी केली होती. मात्र, त्याकडे लक्ष न दिले गेल्याने वैतागून ते रेडा घेऊन तिसऱ्या मजल्यावर हजर झाले.

# भजन पाहताना सर्पदंश झाल्याने मृत्यू

**सोलापूर :** शेतातील घरासमोर बसून ते मोबाईलवर भजन पाहत असताना पायाला नागाने दंश केल्याने राजूर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ नानासाहेब देशमुख (५६, रा. बंकलगी) यांचा मंगळवारी दुपारी मृत्यू झाला.

नॅशनल हेल्थ सिस्टीम रिसोर्स सेंटर
राष्ट्रीय आरोग्य मिशन सह तांत्रिक आधार संस्था
आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार

नॅशनल हेल्थ सिस्टीम रिसोर्स सेंटर (एनएचएसआरसी), नवी दिल्ली हे खालील पदाकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे.

- **सल्लागार - सार्वजनिक आरोग्य प्रशासन, एनएचएसआरसी**

संदर्भाच्या अटी (टीओआर) आणि पदांचा इतर तपशील वेबसाइट **www.nhsrcindia.org, www.mohfw.gov.in** आणि **www.devnetjobsindia.org** वर उपलब्ध आहे. अर्ज केवळ (वेबसाइटमध्ये नमूद केल्यानुसार) विहित ऑनलाईन अर्जाच्या नमुन्यात **२९ नोव्हेंबर २०२२** पर्यंत अवश्य पोहोचले पाहिजेत.

**स्वा/-: मुख्य प्रशासकीय अधिकारी, एनएचएसआरसी**

Godrej magic




This tiny sachet makes a 200 ml bottle of bodywash.




GODREJ | CONSUMER PRODUCTS LIMITED

**Extract of Consolidated Unaudited Financial Results for the Quarter and Half Year ended September 30, 2022**

(₹ Crore)

| Sl. No. | Particulars | Quarter ended 30-Sep-22 | Quarter ended 30-Jun-22 | Quarter ended 30-Sep-21 | Half Year ended 30-Sep-22 | Half Year ended 30-Sep-21 | Year ended 31-Mar-22 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations | 3391.92 | 3124.97 | 3163.65 | 6516.89 | 6058.10 | 12276.50 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period before Tax, Exceptional items | 480.41 | 456.20 | 606.84 | 936.61 | 1149.54 | 2164.73 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax and after Exceptional items | 457.74 | 454.37 | 605.61 | 912.11 | 1146.51 | 2155.26 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax | 358.86 | 345.12 | 478.89 | 703.98 | 892.55 | 1783.39 |
| 5 | Total Comprehensive Income for the period (Comprising Profit / (Loss) for the period (after tax) & Other Comprehensive Income (after tax) | 566.82 | 560.59 | 448.34 | 1127.41 | 1071.80 | 2159.95 |
| 6 | Paid-up Equity Share Capital (Face value per share: ₹ 1) | 102.26 | 102.26 | 102.26 | 102.26 | 102.26 | 102.26 |
| 7 | Earnings per share (before extraordinary items) (of ₹ 1 each) *(Not Annualised)* | | | | | | |
| | Basic (₹) | 3.51 | 3.37 | 4.68 | 6.88 | 8.73 | 17.44 |
| | Diluted (₹) | 3.51 | 3.37 | 4.68 | 6.88 | 8.73 | 17.44 |
| 8 | Earnings per share (after extraordinary items) (of ₹ 1 each) *(Not Annualised)* | | | | | | |
| | Basic (₹) | 3.51 | 3.37 | 4.68 | 6.88 | 8.73 | 17.44 |
| | Diluted (₹) | 3.51 | 3.37 | 4.68 | 6.88 | 8.73 | 17.44 |

Key numbers of Unaudited Standalone Financial Results (₹ Crore)

| Particulars | Quarter ended 30-Sep-22 | Quarter ended 30-Jun-22 | Quarter ended 30-Sep-21 | Half Year ended 30-Sep-22 | Half Year ended 30-Sep-21 | Year ended 31-Mar-22 |
|---|---|---|---|---|---|---|
| Turnover | 1952.97 | 1813.71 | 1809.09 | 3766.68 | 3430.26 | 6819.32 |
| Profit before tax | 414.52 | 409.60 | 445.30 | 824.13 | 870.53 | 1762.45 |
| Profit after Tax | 328.19 | 319.53 | 356.26 | 647.73 | 681.63 | 1479.15 |

**Note:**

1. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the Stock Exchange websites viz.www.bseindia.com and www.nseindia.com. The same is also available on the company's website viz.www.godrejcp.com.

Place:Mumbai
Date: November 8, 2022

**By Order of the Board**
**For Godrej Consumer Products Limited**

**Nisaba Godrej**
**Executive Chairperson**



Godrej One, 4th Floor, Pirojshanagar, Eastern Express Highway, Vikhroli (E), Mumbai 400 079, India www.godrejcp.com, CIN : L24246MH2000PLC129806

